ePaper

**‘पुन्हा हल्ला केला तर युद्ध हिंदी महासागरापर्यंत नेऊ’ इराणचा थेट इशारा**




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज़™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 25 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 3 वरुन...

विसर्जन मिरवणुकीवर पोलिसांची करडी नजर

## मेघालयमध्ये १२ पैकी ८ आमदारांचा भाजपा प्रवेश

# आणखी एक पक्ष फुटला!





### यूडीपीला मोठा धक्का; चार आमदार शिल्लक

यूडीपीच्या आठ आमदारांनी एकाचवेळी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षाचे संख्याबळ १२ वरून चारवर आले आहे. सत्ताधारी आघाडीचा घटक असलेल्या यूडीपीतील या मोठ्या फुटीमुळे मेघालयच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. आगामी काळात या पक्षांतराचा सत्ताधारी आघाडीच्या राजकीय वाटचालीवर काय परिणाम होतो, याकडे लक्ष लागले आहे.

### भाजपचे संख्याबळ १० वर

मेघालय विधानसभेत भाजपचे यापूर्वी केवळ दोन आमदार होते. यूडीपीच्या १२ पैकी आठ आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर भाजपचे संख्याबळ थेट १० वर पोहोचले आहे. त्यामुळे ६० सदस्यांच्या विधानसभेत एनपीपीनंतर भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे.



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मेघालयच्या राजकारणात बुधवारी मोठी राजकीय घडामोड घडली. सत्ताधारी आघाडीतील युनायटेड डेमोक्रॅटिक पार्टीच्या (यूडीपी) १२ पैकी आठ विद्यमान आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे ६० सदस्यांच्या मेघालय विधानसभेत भाजपचे संख्याबळ दोनवरून थेट दहावर पोहोचले आहे. या प्रवेशामुळे भाजप विधानसभेतील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे.**

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा आणि अन्य वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत भाजप मुख्यालयात हा पक्षप्रवेश झाला. लखमेन रिम्बुई, पियूस मारवेन, किर्मेन श्यल्ला, मायरेलबार्न सिएम, मॅथ्यू कुर्बाह, ओलान सिंग सुईन, बालाजिएद कुआपर सिनरेम आणि सिनशर कुआपर रॉय यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या राजकीय घडामोडीमुळे यूडीपीचे संख्याबळ १२ वरून चार आमदारांवर आले आहे. भाजप आणि यूडीपी हे दोन्ही पक्ष मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल पीपल्स पार्टीच्या (एनपीपी) नेतृत्वाखालील मेघालय डेमोक्रॅटिक अलायन्सचे घटक आहेत. त्यामुळे या पक्षांतराचा सत्ताधारी आघाडीतील राजकीय समीकरणांवर परिणाम होणार का, याकडे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी मात्र या घडामोडीचा सरकारच्या स्थैर्यावर परिणाम होणार नसल्याचे म्हटले आहे. भाजपमध्ये प्रवेश करण्यापूर्वी या आमदारांच्या पक्षांतराबाबत काही काळापासून चर्चा सुरू होती. यूडीपीचे आमदार किर्मेन श्यल्ला यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चाही झाल्या होत्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबतही विविध मागण्यांवर चर्चा झाल्याचे वृत्त आहे. १२ सप्टेंबर रोजी यूडीपीचे माजी आमदार आणि वरिष्ठ नेते डॉ. जेमिनो मावथोह यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर यूडीपीतील संभाव्य फुटीची चर्चा अधिक तीव्र झाली होती.

मेघालयातील विविध प्रश्नांवर केंद्र सरकारकडून सहकार्य मिळावे, यासाठी चर्चा झाल्याचे नव्याने भाजपमध्ये दाखल झालेल्या आमदारांनी सांगितले. खासी भाषेला संविधानाच्या आठव्या अनुसूचीत स्थान देणे, कोळसा खाणकामाशी संबंधित प्रश्न, मेघालय रेसिडेंट्स सेफ्टी अँड सिक्युरिटी कायद्यातील बदल आणि हारिजन कॉलनीच्या स्थलांतरासह काही स्थानिक प्रश्न त्यांच्या मागण्यांमध्ये असल्याचे यापूर्वी समोर आले होते.

भाजपचे संख्याबळ आता १० झाले असून एनपीपीनंतर तो विधानसभेतील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. दुसरीकडे, आठ आमदारांच्या पक्षांतरामुळे यूडीपीकडे आता केवळ चार आमदार राहिले आहेत. त्यामुळे मेघालयच्या राजकारणात या घडामोडीचे पुढील पडसाद काय उमटतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# बाप्पाच्या निरोपासाठी पुणे सज्ज!

## मानाच्या गणपतींच्या मिरवणुकीचा आज थाट; ढोल-ताशांचा गजर, आकर्षक रथ अन् जिवंत देखावे

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील ऐतिहासिक आणि वैभवशाली गणेशोत्सवाची सांगता आज (दि. २५) अनंत चतुर्दशीला होणार आहे. मानाच्या गणपतींसह प्रमुख गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीची तयारी पूर्ण झाली असून, रांगोळ्यांच्या मनोहारी पायघड्या, फुलांनी सजविलेले रथ, ढोल-ताशांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात लाडक्या बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. विविध संकल्पनांवरील रथ, जिवंत देखावे आणि जनजागृतीपर संदेश यंदाच्या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत.**



महात्मा फुले मंडई येथील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्याला आज सकाळी ९.३० वाजता पुष्पहार अर्पण करून विसर्जन मिरवणुकीच्या मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ होणार आहे. त्यानंतर बेलबाग चौकातून सकाळी १०.१५ वाजता मानाचा पहिला श्री कसबा गणपतीच्या मिरवणुकीला सुरुवात होईल. मिरवणूक सुरळीत आणि निर्विघ्न पार पडावी, यासाठी महापालिका आणि पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे.

मानाचा पहिला श्री कसबा गणपतीची पालखी पारंपरिक रजत पालखीतून निघणार आहे. विविध ढोल-ताशा पथके, दिंड्या आणि कामायनी प्रशालेतील विशेष मुलांची दिंडी सहभागी होणार आहे. पर्यावरणसंवर्धनाचा संदेश देणारा 'हरित रथ' यंदाचे विशेष आकर्षण ठरणार असून, त्यावर पारंपरिक नगारा आणि चौघड्याचे वादन होणार आहे. 'नशामुक्त भारत' अभियानातून जनजागृतीपर संदेशही दिला जाणार आहे. मानाचा दुसरा श्री तांबडी जोगेश्वरीची मिरवणूक पारंपरिक पद्धतीने निघणार आहे. नगारा, ब्रास बँड आणि विविध ढोल-ताशा पथकांसह पारंपरिक वेशातील महिला व पुरुष कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. शंखनादाच्या गजरात चांदीच्या पालखीत विराजमान श्रींची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

मानाचा तिसरा श्री गुरुजी तालीम मंडळाची मिरवणूक नगारा, ब्रास बँड आणि ढोल-ताशांच्या गजरात निघणार असून, 'माता महाकाली' संकल्पनेवरील आकर्षक फुलांच्या रथातून श्रींची मिरवणूक होणार आहे. मानाचा चौथा श्री तुळशीबाग गणपतीची मिरवणूक भव्य विष्णू रथातून काढण्यात येणार आहे. १६ फूट रुंद, २२ फूट लांब आणि ३२ फूट उंच असलेल्या या रथावर विष्णूची १० फूट उंच मूर्ती साकारण्यात आली आहे. कमळातील गणराया, जलपरी, गाय, हत्ती, नाग आणि मत्स्य यांच्या फुलांच्या सजावटीमुळे रथ आकर्षक ठरणार आहे. मानाचा पाचवा केसरीवाडा गणपतीच्या मिरवणुकीला आज सकाळी साडेदहा वाजता सुरुवात होणार आहे. महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त जिवंत देखावा सादर केला जाणार असून, लोकमान्य टिळक आणि आगरकर कारागृहातून सुटल्यानंतर महात्मा फुले यांनी केलेले स्वागत हा देखाव्याचा विषय आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती 'श्री वक्रतुंड रथा'तून मिरवणुकीत सहभागी होणार आहे. वृंदावन येथील प्रेम मंदिराच्या संकल्पनेवर आधारित या रथाची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भारतीय मंदिर वास्तुकला आणि पारंपरिक शिल्पकलेचा संगम रथात पाहायला मिळणार आहे. अमली पदार्थमुक्त भारताचा संदेश देणारा मानवसेवा रथही मिरवणुकीत सहभागी होणार आहे.

अखिल मंडई गणपतीसाठी कोणार्क सूर्य मंदिराच्या वास्तुशैलीवर आधारित सुमारे ३२ फूट उंच रथ साकारण्यात आला आहे. आकर्षक विद्युत रोषणाईने सजलेला हा रथ मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. नगारा वादन, न्यू गंधर्व बँड आणि शिवगर्जना पथकाच्या वादनाने मिरवणुकीत उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे.

### मिरवणुकीचा प्रारंभ

सकाळी ९.३० वाजता टिळकांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.१५ वाजता बेलबाग चौकातून मानाचा पहिला कसबा गणपतीच्या मिरवणुकीला प्रारंभ होईल.

### भव्य रथ ठरणार आकर्षण

तुळशीबागचा विष्णू रथ, दगडूशेठचा वक्रतुंड रथ आणि अखिल मंडईचा कोणार्क सूर्य मंदिराच्या वास्तुशैलीवरील रथ यंदाच्या मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. ढोल-ताशा, नगारा, ब्रास बँड आणि जिवंत देखाव्यांनी मिरवणुकीत रंगत वाढणार आहे.

# रोहित पवारांच्या एमपीएससी आंदोलनाला पोलिसांचा 'ब्रेक'!

**महाईन्यूज । पुणे**

**एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आमदार रोहित पवार यांनी रविवार (दि. २७) पासून अलका टॉकीज चौकात उपोषण व आंदोलन करण्यासाठी मागितलेली परवानगी पुणे पोलिसांनी नाकारली आहे. अलका टॉकीज चौक हा शहरातील महत्त्वाचा व संवेदनशील टप्पा असून, गणेश विसर्जन मिरवणुकीनंतरही तेथील कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता महत्त्वाची असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव परवानगी नाकारण्यात आल्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले.**



अलका टॉकीज चौकात मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आणि त्या परिसरातील संवेदनशीलता लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्राप्त अधिकारांनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आल्याचे पोलिस आयुक्तांनी सांगितले. एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आमदार रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांसह आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यांनी सुरुवातीला २६ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्याचे जाहीर केले होते. मात्र, त्या दिवशी विसर्जन मिरवणुकीचा बंदोबस्त असल्याने आंदोलनाची तारीख २७ सप्टेंबर करण्याची मागणी पवार यांनी केली होती. याबाबत पोलिसांकडे परवानगीचा अर्ज करण्यात आला होता.

पोलिस प्रशासनाने अलका टॉकीज चौकातील आंदोलनाची मागणी अमान्य केली आहे. दरम्यान, आंदोलनासाठी विभागीय आयुक्त कार्यालय किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर यांसारख्या पर्यायी ठिकाणांचा प्रस्ताव प्रशासनाने आंदोलकांना दिला आहे.

### २७ सप्टेंबरला आंदोलन

रोहित पवार यांनी एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांसह २७ सप्टेंबरपासून उपोषण व आंदोलनाची घोषणा केली आहे. गणेश विसर्जनाच्या बंदोबस्तामुळे २६ सप्टेंबरऐवजी आंदोलनाची तारीख बदलण्यात आली.

# पिंपरीच्या रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य!

## चार महिन्यांत तीन हजार खड्डे; विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची धावपळ

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**गणेशोत्सवापूर्वी पिंपरी-चिंचवड शहर खड्डेमुक्त करण्याचा महापालिका प्रशासनाचा दावा फोल ठरल्याचे चित्र आहे. उद्या, शुक्रवारी (दि. २५) गणेश विसर्जन मिरवणूक होणार असून, शहरातील प्रमुख रस्त्यांवरील खड्डे मिरवणुकीसाठी अडथळा ठरण्याची शक्यता आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक रस्त्यांवर पुन्हा खड्डे पडले आहेत. मात्र, शहरात सध्या केवळ २५२ खड्डे बुजविणे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरात पक्के, कच्चे, डांबरी आणि काँक्रीटचे सुमारे दोन हजार ७३ किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. जूनपासून शहरातील विविध भागांतील रस्त्यांवर तीन हजार ६० खड्डे आढळले. त्यापैकी दोन हजार ८०९ खड्डे बुजविण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले. डांबर व कोल्ड मिक्सने ९१२, बीबीएमने ५४, खडीने एक हजार २८९, पेव्हिंग ब्लॉकने २४५ आणि काँक्रीटने २२९ खड्डे बुजविण्यात आले आहेत. खड्डे बुजविण्याचे प्रमाण ९१.८० टक्के असल्याचा प्रशासनाचा दावा आहे.

मात्र, मुंबई-पुणे महामार्गावरील पिंपरी ते चिंचवड स्टेशनदरम्यान तसेच निगडीतील सेवा रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. बीआरटी मार्गावरही अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमधून सुटलेली खडी दुचाकीस्वारांसाठी धोकादायक ठरत असून, वाहन घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. खड्डे चुकविताना वाहनचालकांना कसरत करावी लागत असल्याने वाहतूक संथ होत असून कोंडीतही भर पडत आहे.

पुणे-मुंबई महामार्गावरील समतल विलगकामधील आगमन-निर्गमन मार्गांमध्ये वारंवार बदल करण्यात येत असल्याने वाहतुकीवर परिणाम होत आहे. चिंचवड स्टेशन आणि निगडीतील पवळे उड्डाणपुलाच्या अलीकडील मार्गात बदल करण्यात आला आहे. निगडीतील समतल विलगकामधून बाहेर पडण्यासाठी योग्य मार्ग नसतानाही काही रिक्षाचालक आणि दुचाकीस्वार विरुद्ध दिशेने येत असल्याने वाहतूक कोंडी वाढत आहे.

शहरातील खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. मात्र, दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे काही ठिकाणी पुन्हा खड्डे पडले आहेत. महामार्गावरील सेवा रस्त्याची तातडीने दुरुस्ती न केल्याने संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावण्यात आली असल्याचे महापालिकेचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### ९१.८० टक्के खड्डे बुजविल्याचा दावा

जूनपासून आढळलेल्या ३ हजार ६० खड्ड्यांपैकी २ हजार ८०९ खड्डे बुजविल्याचा महापालिकेचा दावा आहे. अद्याप २५२ खड्डे शिल्लक असल्याचे प्रशासनाने सांगितले.

### पावसाने उघडले रस्त्यांचे पितळ!

दोन दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसामुळे बुजविलेले काही खड्डे पुन्हा उखडले आहेत. त्यामुळे गणेश विसर्जनाच्या तोंडावर रस्ते दुरुस्तीचे आव्हान महापालिकेसमोर उभे राहिले आहे.

# विसर्जन मिरवणुकीवर पोलिसांची करडी नजर; १,३९८ मंडळे सज्ज

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**गणेशोत्सव शांततेत आणि निर्विघ्न पार पडावा, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विसर्जन मिरवणुकीसाठी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. अनंत चतुर्दशीनिमित्त आज (दि. २५) शहरातील १,३९८ सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका निघणार असून, ६८ हजार ९९६ घरगुती गणेशमूर्तींचेही विसर्जन होणार आहे. यासाठी साडेतीन हजारांहून अधिक पोलिस अधिकारी व अंमलदारांसह आरसीपी पथके, होमगार्ड, एमआरपीएफ आणि वॉर्डनचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईला वेग दिला आहे. बुधवारपर्यंत (दि. २३) तब्बल ५,१०७ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, ३० सराईत गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई झाली आहे. गतवर्षी ३,८५६ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. यंदा ही संख्या वाढली आहे. उत्सवाच्या काळात प्रत्येक गणेश मंडळाशी समन्वय ठेवण्यासाठी 'एक मंडळ-एक अंमलदार' ही संकल्पनाही राबविण्यात आली.

पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून निर्धारित ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या डीजे चालक आणि मालकांविरोधात आतापर्यंत ६३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. परिमंडळ एकमध्ये १६, परिमंडळ दोनमध्ये ३३, परिमंडळ तीनमध्ये पाच आणि परिमंडळ चारमध्ये नऊ गुन्हे दाखल झाले आहेत. या कारवाईत ५८ मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत यंदा २,४११ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि २ लाख ७० हजार १२४ घरगुती गणपतींची स्थापना झाली. दीड दिवसाच्या गणपतींच्या विसर्जनाला १५ सप्टेंबरपासून सुरुवात झाली आहे. आता अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीसाठी पोलिस यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे.

विसर्जन बंदोबस्तासाठी एक अपर पोलिस आयुक्त, आठ पोलिस उपायुक्त, १६ सहायक पोलिस आयुक्त, ७४ पोलिस निरीक्षक, २९० सहायक पोलिस निरीक्षक व पोलिस उपनिरीक्षक आणि २,७८० पोलिस अंमलदार तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय सहा आरसीपी पथके, ६०२ होमगार्ड, एमआरपीएफच्या दोन प्लाटून आणि १६६ वॉर्डनचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी आयुक्तालय, परिमंडळ आणि पोलिस ठाणे स्तरावर गणेश मंडळांचे पदाधिकारी तसेच शांतता समिती सदस्यांच्या एकूण १७५ बैठका घेण्यात आल्या. मंडळांनी सीसीटीव्ही बसवावेत, २४ तास स्वयंसेवक तैनात ठेवावेत, लेझर लाइटचा वापर टाळावा आणि ध्वनिप्रदूषणाबाबत न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करावे, अशा सूचना पोलिसांनी दिल्या आहेत. मूर्तींची सुरक्षित वाहतूक आणि मिरवणुकीदरम्यान कायदा-सुव्यवस्था राखण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे.

### १७५ बैठका; मंडळांना आधीच सूचना

गणेशोत्सवापूर्वी पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. मूर्तीची सुरक्षित वाहतूक, मंडपात २४ तास स्वयंसेवक, सीसीटीव्ही, लेझर लाइट टाळणे आणि डीजेमुळे होणारे ध्वनिप्रदूषण रोखण्यावर या बैठकांमध्ये भर देण्यात आला.

# गणरायासमोर तरी विवेक जागा होऊ द्या!



## भूमिका

**धर्म म्हणजे संयम, सहिष्णुता, परस्परांचा आदर आणि माणुसकी. मग कानठळ्या बसविणारा ढोल-ताशांचा दणदणाट, कर्णकर्कश डीजे, लेझर बीम, फटाक्यांचा आवाज आणि थिल्लर गाण्यांवरचा धांगडधिंगा याला धार्मिकतेचे स्वरूप कसे देता येईल? कोणत्याही धर्मग्रंथात इतरांना त्रास देणे ही भक्ती सांगितलेली नाही.**

उलट, आपल्या आचरणामुळे दुसऱ्याला त्रास होणार नाही, याची काळजी घेणे हाच खरा धर्म आहे. मात्र, उत्सवांच्या नावाखाली नियम मोडले की धार्मिक भावना दुखावल्याचा दावा केला जातो. हा विरोधाभास आता थांबण्याची गरज आहे.

ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम सर्वश्रुत आहेत. वृद्ध, लहान मुले, रुग्ण, विद्यार्थी आणि प्राण्यांनाही मोठ्या आवाजाचा त्रास होतो. रक्तदाब, निद्रानाश, मानसिक ताण आणि श्रवणविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणूनच ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी केंद्र सरकारने नियम केले आहेत. रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत मोठ्या आवाजावर निर्बंध आहेत.



सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी ध्वनिप्रदूषणाबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. तरीही उत्सवाच्या काळात या नियमांकडे सर्रास दुर्लक्ष होते. पोलिसांकडून परिपत्रके काढली जातात; पण प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र अपुरी राहते. कायदा केवळ कागदावर असेल, तर त्याचा धाक कसा निर्माण होणार? मुंबई उच्च न्यायालयाने याच प्रश्नावर सरकारला जाब विचारला आहे.

कायदे असताना त्यांचे पालन का होत नाही, असा न्यायालयाचा सवाल आहे. हा प्रश्न केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित नाही. कोणत्याही धर्माच्या उत्सवाला कायद्याचे समान निकष लागू असले पाहिजेत. एका ठिकाणी नियमांची अंमलबजावणी आणि दुसरीकडे राजकीय किंवा धार्मिक दबावामुळे दुर्लक्ष, अशी परिस्थिती निर्माण झाली तर कायद्याच्या राज्यावरील विश्वासच कमकुवत होतो.

धार्मिक उत्सवांमध्ये उत्साह असावा; मात्र तो इतरांच्या हक्कांवर अतिक्रमण करणारा नसावा. पंढरपूरची वारी लाखो वारकऱ्यांच्या सहभागाने पार पडते. भक्ती, श्रद्धा आणि सामूहिक उत्साह यासाठी कानठळ्या बसविणाऱ्या आवाजाची आवश्यकता नसते, हे त्यातून दिसते. मग इतर धार्मिक उत्सवांमध्येही संयम, शिस्त आणि पर्यावरणपूरक पद्धती का स्वीकारता येऊ नयेत?

कायद्याचे पालन करणे ही कोणत्याही धर्माविरोधातील भूमिका नाही. उलट, कायद्याचा सन्मान करणे हा नागरिकधर्म आहे. मशिदींवरील भोंगे असोत, गणेशोत्सवातील डीजे असोत किंवा अन्य कोणत्याही धार्मिक कार्यक्रमातील ध्वनिप्रदूषण—निकष सर्वांसाठी समान असले पाहिजेत.

धार्मिक भावना आणि कायद्याचे पालन यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी दोन्हींचा समतोल साधणे आवश्यक आहे. सत्ताधाऱ्यांनीही बहुमताच्या नाराजीच्या भीतीने कायद्याच्या अंमलबजावणीत मागे हटणे योग्य नाही. नियम अव्यवहार्य वाटत असतील तर लोकशाही पद्धतीने त्यात बदल करावेत; परंतु अस्तित्वात असलेल्या कायद्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे ही व्यवस्था कमकुवत करणारी बाब आहे. धर्मभावना जपताना दुसऱ्याच्या शांततेचा, आरोग्याचा आणि जगण्याच्या अधिकाराचा आदर केला पाहिजे. बुद्धिदाता श्रीगणेशाच्या उत्सवात भक्तिबरोबर विवेकाचाही जागर व्हावा आणि समाजातील या 'अ'धर्माचे विसर्जन व्हावे, हीच अपेक्षा.

## प्रासंगिक »

# चिमणीचा धडा

**एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याच्या शेताच्या बांधावर एक चिमणी रोज येऊन दाणे टिपायची. शेतकरी तिला कधी हाकलत नसे. एके दिवशी त्याने पाहिले की शेतात उगवलेली काही रोपे वाळत आहेत. पाणी कमी पडत होते.**

शेतकरी चिंतेत पडला. चिमणी रोज दूरवरून पाण्याचे छोटे थेंब चोचीत आणून वाळलेल्या रोपांजवळ टाकू लागली. हे पाहून शेतकऱ्याला आश्चर्य वाटले. त्याने चिमणीला विचारले, "तू एवढ्याशा थेंबाने काय साधणार?"

चिमणी म्हणाली, "मला माहीत आहे की माझ्या एका थेंबाने संपूर्ण शेत वाचणार नाही. पण मी काहीच केले नाही, तर ते नक्कीच वाचणार नाही." शेतकऱ्याला तिचे बोलणे मनापासून पटले. त्याने लगेच विहिरीतून पाणी काढून रोपांना दिले. काही दिवसांत रोपे पुन्हा हिरवीगार झाली. त्याने चिमणीसाठी शेताच्या कडेला पाण्याचे भांडेही ठेवले.

त्या दिवसापासून शेतकरी कधीही छोट्या प्रयत्नाला कमी लेखत नसे. गावातील इतर लोकांनीही ही गोष्ट पाहून संकटात एकमेकांना मदत करण्यास सुरुवात केली."

- तात्पर्य : छोटा प्रयत्नही मोठ्या बदलाची सुरुवात ठरू शकतो.

शिक्षण हे समानतेचे आणि संधीचे माध्यम मानले जाते. मात्र, देशातील काही नामांकित उच्चशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक आणि जातीय भेदभावाला सामोरे जावे लागत असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे.

# एकलव्य बदलला; मानसिकता बदललेली नाही!

आयआयटी मुंबईतील बी.टेक.च्या विद्यार्थ्याच्या आत्महत्येने पुन्हा एकदा या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण केली आहे. साहिल वाकोडे हा यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थी. जेईईच्या माध्यमातून त्याने आयआयटीमध्ये प्रवेश मिळवला आणि पहिल्या वर्षी चांगली कामगिरीही केली.

त्याच्या मृत्यूनंतर त्याच्यावर परीक्षेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून गैरप्रकार केल्याचा आरोप करण्यात आला. मात्र, या आरोपाला पुरेसा अधिकृत आधार नसल्याचे पुढे आले आणि आयआयटी प्रशासनाला त्या निवेदनाबद्दल माफी मागावी लागली. संबंधित अधिष्ठात्याचे पदही काढून घेण्यात आले. या घटनाक्रमामुळे साहिलवर झालेल्या आरोपांबरोबरच संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या तक्रारींच्या हाताळणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



रोहित वेमुला, दर्शन सोलंकी आणि डॉ. पायल तडवी यांच्या घटनांनीही यापूर्वी अशाच प्रश्नांना देशासमोर आणले आहे. प्रत्येक प्रकरणाची कारणे आणि परिस्थिती वेगळी असली, तरी उच्चशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक सुरक्षिततेचा आणि भेदभावविरोधी यंत्रणांचा प्रश्न समान आहे. विशेषतः आरक्षित प्रवर्गातून आलेल्या विद्यार्थ्यांना सामाजिक पूर्वग्रहांना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

आयआयटी, एनआयटी, आयआयएमसारख्या संस्थांमध्ये अभ्यासक्रमाचा ताण, अपयशाची भीती, भविष्यातील रोजगाराची चिंता यांसारखी कारणे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. अशा परिस्थितीत जातीय शेरेबाजी, सामाजिक बहिष्कार किंवा अपमानाची भर पडली तर संकट अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे आत्महत्येच्या प्रत्येक घटनेकडे संवेदनशीलतेने आणि निष्पक्षपणे पाहणे आवश्यक आहे. एखाद्या विद्यार्थ्याच्या मृत्यूनंतर त्याच्यावर दोषारोप करण्यापेक्षा त्याला अशी टोकाची पायरी का गाठावी लागली, याचा पारदर्शक तपास होणे महत्त्वाचे आहे.

तक्रार निवारण व्यवस्था स्वतंत्र आणि विश्वासार्ह असावी. भेदभावाच्या तक्रारींची चौकशी वेळेत व्हावी आणि दोषी आढळल्यास कारवाई झाली पाहिजे. एकलव्याचा अंगठा मागणारी व्यवस्था आता बदलली पाहिजे. गुणवत्तेला जात, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमीची अडचण न बनविता प्रत्येक विद्यार्थ्याला सन्मानाने शिकता आले पाहिजे. शिक्षणसंस्थांनी केवळ तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ नव्हे, तर संवेदनशील आणि समतावादी नागरिकही घडवले पाहिजेत. अन्यथा एकलव्याचा अंगठा नव्हे, जीवच घेणारी मानसिकता समाजासाठी अधिक घातक ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



भोरप्यानें सोंग पालटिलें वरी ।
ध्यान धरी मत्स्या जैसें ॥१॥

टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं ।
देखों नेदि जगीं फांसे जैसे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पूर्व विदर्भाच्या विकासाला ‘महावेग’!

## ४२ हजार कोटींच्या महामार्गांना मंजुरी; ४६० किलोमीटरहून अधिक महामार्गांचे जाळे”

**महाईन्यूज | नागपूर**

**पूर्व विदर्भातील दळणवळणाला नवी दिशा देणाऱ्या चार महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्पांना राज्य सरकारने प्रशासकीय मंजुरी दिली आहे. नागपूर-गोंदिया, नागपूर-चंद्रपूर आणि भंडारा-गडचिरोली प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्गासह नवेगाव-कोनसरी-मूळचेरा-हेदरी ते सूरजागड या मार्गाच्या निधीलाही मंजुरी मिळाली आहे. चारही प्रकल्पांचा एकत्रित खर्च ४२ हजार कोटी रुपयांहून अधिक असून, पूर्व विदर्भात ४६० किलोमीटरहून अधिक लांबीचे द्रुतगती मार्ग उभारले जाणार आहेत.**



या महामार्गांमुळे नागपूरची गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीशी जोडणी अधिक वेगवान होणार असून, पूर्व विदर्भातील कृषी, खनिज आणि औद्योगिक वाहतुकीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. नागपूर-गोंदिया महामार्गाची लांबी १६२.५७७ किलोमीटर, नागपूर-चंद्रपूर महामार्गाची २०४.७९९ किलोमीटर, तर भंडारा-गडचिरोली महामार्गाची लांबी ९४.२४१ किलोमीटर आहे. याशिवाय गडचिरोलीतील नवेगाव-कोनसरी-मूळचेरा-हेदरी ते सूरजागड मार्गासाठी ३,१५४.९९ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

नागपूर-गोंदिया प्रकल्पाचा प्रत्यक्ष बांधकाम खर्च ८,०३३.३७ कोटी रुपये असून, जीएसटीसह एकूण प्रकल्प खर्च १२,८७८.२४ कोटी रुपये आहे. या प्रकल्पासाठी २० वर्षांच्या मुदतीचे १०,१४० कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यास आणि शासनाच्या भागभांडवलातून ४,५५२.०१ कोटी रुपये देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

नागपूर-चंद्रपूर महामार्गासाठी १६,३५४.५५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा प्रत्यक्ष बांधकाम खर्च ८,२२३.५९ कोटी रुपये आहे. प्रकल्पासाठी २० वर्षांच्या मुदतीचे १२,८८० कोटी रुपयांचे कर्ज आणि ४,७२५.२६ कोटी रुपयांच्या भागभांडवलास मान्यता देण्यात आली आहे. भंडारा-गडचिरोली महामार्गाचा प्रत्यक्ष बांधकाम खर्च ५,९९५ कोटी रुपये असून, या प्रकल्पासाठी ९,६१०.६३ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

### कृषी, खनिज वाहतुकीला मिळणार वेग

शहरातील ६७४ खासगी रुग्णालयांपैकी केवळ २६० रुग्णालयांनी अग्निसुरक्षा लेखापरीक्षण पूर्ण करून अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घेतले आहे. तब्बल ४१४ रुग्णालयांनी अद्याप प्रमाणपत्र घेतलेले नाही. वारंवार आवाहन व नोटिसा देऊनही नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर महापालिका कठोर पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे.

### स्वतंत्र कंपन्यांमार्फत अंमलबजावणी

नागपूर-गोंदिया, नागपूर-चंद्रपूर आणि भंडारा-गडचिरोली हे तीनही प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबविले जाणार आहेत. प्रत्येक महामार्गासाठी २४ वर्षांचा सवलत कालावधी मंजूर करण्यात आला असून, त्यात तीन वर्षांचा बांधकाम कालावधी समाविष्ट आहे. प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) स्थापन करण्यात आले आहेत.

# महाराष्ट्रात उद्याच ‘कोरडा दुष्काळ’ जाहीर; मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

**महाईन्यूज | वाशिम**

**राज्यातील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि. २५) कोरड्या दुष्काळासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. तसेच शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्याबरोबरच पीकविम्याची पूर्ण रक्कम मिळवून देण्याची आणि कर्जवसुलीला स्थगिती देण्याची ग्वाही त्यांनी दिली.**



मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २४) वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील म्हसला, मंगरुळपीर तालुक्यातील मोहगव्हाण आणि मालेगाव तालुक्यातील जऊळका या गावांना भेटी दिल्या. त्यांनी शेतांमध्ये जाऊन पिकांची पाहणी केली तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. अल्प पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान आणि पाण्याची उपलब्धता याबाबत शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना माहिती दिली.

“उद्या आपण कोरड्या दुष्काळाचा जीआर काढणार आहोत. सगळ्यांना पूर्णपणे मदत करणार आहोत. २०१६-१७ मध्ये कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी दिली जाईल. पीकविम्याचे प्रश्नही सोडवले जातील. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये,” असे फडणवीस यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना थेट त्यांच्या खात्यात आर्थिक मदत देण्यात येणार असून, पिण्याचे पाणी, चारा आणि अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठीही शासनाकडून मदत केली जाईल. काही भागांत मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यासाठीही मदत केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांकडून बँकांनी कर्जाची वसुली करू नये, यासाठी सूचना देण्यात येतील. कर्जवसुलीला पूर्णपणे स्थगिती देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. ज्या भागांत पाण्याची उपलब्धता आहे, तेथे रब्बी हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांना शासनाकडून मदत केली जाईल.

पीकविम्याच्या प्रश्नावरही सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. पीकविमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना मिळणारी संपूर्ण रक्कम मिळवून देण्यासाठी शासन हस्तक्षेप करेल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसह विविध पातळ्यांवर दिलासा देण्याची तयारी सरकारने दर्शविली आहे.

### कर्जाच्या वसुलीला स्थगिती देणार

"अतिशय अडचणीची परिस्थिती आलेली आहे. बँकांनाही आम्ही सांगू. कोणत्याही बँकांना वसूली करू देणार नाही. कर्जाच्या वसुलीला पूर्णपणे स्थगिती देऊ. जिथे जिथे पाण्याची उपलब्धता होईल, तिथे रब्बीच्या पिकासाठी शेतकऱ्यांना पूर्ण मदत दिली जाईल. पिक विमा कंपन्यांना आम्ही सरळ करू आणि त्यांच्याकडून पूर्ण पैसा मिळवू", अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिले.

# इराणचा अमेरिका-इस्रायलला थेट इशारा

## अमेरिका किंवा इस्रायलने पुन्हा हल्ला केल्यास युद्ध हिंदी महासागरापर्यंत नेण्याचा इशारा

**महाईन्यूज । युक्रेन**

**अमेरिका आणि इराणमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तणाव आणखी वाढला आहे. अमेरिकेने किंवा इस्रायलने पुन्हा हल्ला केल्यास युद्धाचा भौगोलिक विस्तार हिंदी महासागरापर्यंत होऊ शकतो, असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेईचे सल्लागार याह्या रहीम सफवी यांनी दिला आहे. इराणच्या फार्स वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या व्हिडीओमध्ये सफवी यांनी हा इशारा दिला.**



रॉयटर्सच्या माहितीनुसार, गेल्या आठवड्याच्या अखेरीस होर्मुझमधून केवळ १७ मालवाहू जहाजे गेली. त्याआधीच्या आठवड्यात ही संख्या ३७ होती, तर युद्धापूर्वी दररोज सरासरी सुमारे १२५ जहाजे या मार्गातून जात होती. लाल समुद्र आणि अरबी समुद्राला जोडणाऱ्या बाब-अल-मंदेब मार्गावरील वाहतूकही घटली आहे. हिंदी महासागर हा भारताच्या सागरी व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. आखाती देशांमधून भारतात येणारे ऊर्जा स्रोत तसेच आफ्रिका आणि आग्नेय आशियाशी होणारी व्यापार वाहतूक या विस्तृत सागरी क्षेत्राशी जोडलेली आहे. त्यामुळे संघर्षाचा विस्तार हिंदी महासागरापर्यंत झाल्यास जहाज वाहतूक, विमा खर्च, ऊर्जा पुरवठा आणि व्यापार मार्गांवर अतिरिक्त दबाव निर्माण होऊ शकतो. मात्र, सफवी यांच्या या इशाऱ्यामध्ये प्रत्यक्षात कोणत्या प्रकारची लष्करी कारवाई होईल, याबाबत कोणतीही सविस्तर माहिती नमूद केलेली नाही. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८८ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. त्यामुळे आखातातील संघर्ष आणि सागरी मार्गांमधील अडथळ्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होऊ शकतो. पेट्रोलियम प्लॅनिंग अँड ॲनालिसिस सेलच्या आकडेवारीनुसार, भारतीय क्रूड बास्केटची सरासरी किंमत जुलैमध्ये ८२.०४ डॉलर प्रति बॅरल, ऑगस्टमध्ये ९०.१९ डॉलर होती.

होर्मुझ आणि बाब-अल-मंदेबसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांवरील वाहतूक आधीच कमी झाली आहे. अशात संघर्षाचा विस्तार हिंदी महासागरापर्यंत झाल्यास आशियाकडे जाणाऱ्या ऊर्जा आणि व्यावसायिक जहाजांच्या मार्गांवर अतिरिक्त सुरक्षा जोखीम निर्माण होऊ शकते. त्यामुळे भारतासाठी या संघर्षाचा परिणाम केवळ पश्चिम आशियापुरता मर्यादित राहणार नाही, तर कच्चे तेल, एलपीजी, जहाज वाहतूक, विमा आणि आयात खर्च यावरही दबाव वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, भारताकडून या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून, ऊर्जा पुरवठा आणि सागरी व्यापार सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी मार्ग व उपाययोजनांचाही विचार केला जाऊ शकतो. संघर्ष अधिक तीव्र झाल्यास जागतिक तेल बाजारातील अस्थिरता वाढून भारताच्या आयात बिलावर आणि महागाईवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

### ‘युद्ध हिंदी महासागरापर्यंत पोहोचू शकते’

सफवी यांच्या म्हणण्यानुसार, संघर्षाचा विस्तार पर्शियन आखात आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीपासून लाल समुद्रापर्यंत झाला आहे. त्यामुळे पुन्हा लष्करी कारवाई झाल्यास युद्ध आणखी पुढे जाऊन हिंदी महासागर आणि त्यापलीकडेही पोहोचू शकतो. पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडणारी होर्मुझची सामुद्रधुनी जगातील महत्त्वाच्या ऊर्जा वाहतूक मार्गांपैकी एक आहे. संघर्षामुळे या मार्गावरील जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणात घटली आहे.

# ज्ञानेश कुमार यांनी आता माफीचा साक्षीदार व्हावे’, राहुल गांधी यांचे मोठे विधान

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय निवडणूक आयोगातील तीन आयुक्तांपैकी दोन आयुक्तांचा विरोध डावलून मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मनमानी पद्धतीने निर्णय घेतल्याचे वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिल्यानंतर देशभरात खळबळ उडाली. यानंतर विरोधकांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. तसेच लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि कांग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषदेत ज्ञानेश कुमार आणि केंद्रातील एनडीए सरकारवर जोरदार टीका केली.**





राहुल गांधी पुढे म्हणाले, “आमच्या पक्षाने स्वातंत्र्याची लढाई लढली आहे. आम्ही या प्रकरणात शांत बसणार नाही. राष्ट्रद्रोह्यांना नक्कीच शिक्षा केली जाईल. आज नाही तर उद्या, उद्या नाही तर भविष्यात कधीतरी या राष्ट्रद्रोह्यांना सोडले जाणार नाही. काँग्रेस पक्षाकडे याची संपूर्ण माहिती आहे. मी देशातील जनतेला वचन देतो की, पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांची चौकशी होणार.”

राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांचे काही व्हिडीओ दाखवले. ज्यामध्ये अमित शाह अनेक दशके भाजपा सत्तेत राहिल, असा दावा करत आहेत. हा व्हिडीओ दाखविल्यानंतर राहुल गांधी म्हणाले, “भारताने बांगलादेशचे युद्ध जिंकल्यानंतर माजी पंतप्रधान इंदिरा गांधी प्रसिद्धीच्या शिखरावर होत्या. तरीही दोन वर्षांनंतर झालेल्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. अटल बिहारी वाजपेयी, राजीव गांधी यांनाही पराभव पाहावा लागला होता. मग भाजपाचाच विजय कसा काय होत आहे?”


राहुल गांधी यांनी अँटी इन्कम्बन्सीचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, मी ५० वर्षांपासून राजकारण पाहत आहे. लोकशाहीत कोणताही नेता मोठ्या काळापर्यंत सत्तेत राहण्याचा दावा करू शकत नाही. याआधी अनेक मातब्बर नेत्यांनाही पराभव सहन करावा लागला. मग भाजपा आणि नरेंद्र मोदींच्या विरोधातील अँटी इन्कम्बन्सी कुठे गेली? गुजरात किंवा इतर ठिकाणी ते कसे काय जिंकत आहेत? “मत चोरी झाल्यामुळे कायदेही अवैध ठरत आहेत. कारण जर मताचा अधिकारच हिरावला जात असेल तर कायदे बनविणारी यंत्रणाही उद्‌ध्वस्त होत आहे. जर मत चोरी झाली आहे, तर संसदेत तयार केलेले कायदेही अवैध ठरतात, असाही आरोप राहुल गांधी यांनी केला.

### ‘ज्ञानेश कुमारांनी माफीचा साक्षीदार व्हावे’

राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्तांची तक्रार करणाऱ्या दोन इतर आयुक्तांचे कौतुक करताना त्यांनी योग्यच केल्याचे म्हटले. ज्ञानेश कुमार यांनी देशाच्या विरोधात काम केले असून ते राष्ट्रद्रोही आहेत. त्यांनी माफीचा साक्षीदार होऊन चौकशीला सामोरे जावे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.

# अमिताभ बच्चन यांनी सांगितला लग्नाचा किस्सा

अमिताभ बच्चन यांनी 'कौन बनेगा करोडपती १८'च्या मंचावर पत्नी जया बच्चन यांच्यासोबतच्या लग्नाची खास आठवण सांगितली. दोघांनी कोणाशीही चर्चा न करता स्वतःच लग्नाचा निर्णय घेतला आणि अवघ्या दुसऱ्याच दिवशी विवाह केला, असा खुलासा अमिताभ बच्चन यांनी केला. केबीसीमधील स्पर्धक अहेली रॉय यांनी अमिताभ यांना लग्नापूर्वी सासरच्या मंडळींची समजूत कशी काढली, असा प्रश्न विचारला. त्यावर अमिताभ यांनी सांगितले की, एके दिवशी त्यांनी जया बच्चन यांना "लग्न करायचं का?" असे विचारले आणि त्यांनीही होकार दिला. त्यानंतर दोघांनी कोणाशीही चर्चा केली नाही. जया यांनी आपल्या आई-वडिलांना हा निर्णय सांगितल्यानंतर दोन्ही कुटुंबांची भेट झाली आणि दुसऱ्याच दिवशी लग्न पार पडले. अमिताभ बच्चन यांनी आपल्या लग्नाबद्दल बोलताना



मोठ्या थाटामाटाची किंवा गुंतागुंतीच्या तयारीची गरज नसल्याचेही सांगितले. तारीख, कपडे, बँड-बाजा अशा अनेक गोष्टींच्या नियोजनापेक्षा दोघांनी एकमेकांना पती-पत्नी म्हणून स्वीकारणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या या आठवणीमुळे आजच्या भव्य सेलिब्रिटी विवाहांच्या तुलनेत अमिताभ आणि जया बच्चन यांचे लग्न किती साधेपणाने झाले होते, याची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

# आयुष्मान आणि साराचा 'उड़ता तीर'




आयुष्मान खुराना आणि सारा अली खान यांच्या आगामी 'उड़ता तीर' या चित्रपटाची बऱ्याच दिवसांपासून चर्चा सुरू आहे. आता या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ट्रेलरमध्ये ॲक्शन, जासूसी, कॉमेडी, सस्पेन्स आणि चुकीची ओळख अशा अनेक गोष्टी पाहायला मिळत आहेत. त्यामुळे चित्रपटाची कथा नेमकी काय असणार, याची उत्सुकता वाढली आहे. 'उड़ता तीर' या चित्रपटातून दिग्दर्शक आकाश ए. कौशिक दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण करत आहेत. चित्रपटात आयुष्मान खुराना एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. तो बिलाल नावाच्या पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. ट्रेलरमध्ये आयुष्मानचा बिलाल हा पाकिस्तानचा गुप्तचर अधिकारी असल्याचे दिसते. मात्र, एका स्फोटानंतर त्याची स्मरणशक्ती जाते. त्याला स्वतःची खरी ओळख आठवत नाही. यानंतर तो स्वतःला भारताच्या काउंटर-टेररिझम स्क्वॉड म्हणजेच CTSचा अधिकारी समजू लागतो. इथूनच चित्रपटाच्या कथेला वेगळे वळण मिळते. एका बाजूला बिलालची खरी ओळख लपलेली आहे, तर दुसरीकडे तो स्वतःला भारतीय अधिकारी समजत आहे. त्यामुळे पुढे नेमके काय घडते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सारा अली खान या चित्रपटात CTS अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे साराच्या पात्राला बिलालच्या खऱ्या ओळखीची कोणतीही माहिती नसते.




# रणबीरच्या नव्या अवताराने वेधले लक्ष

प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या बहुचर्चित 'लव्ह अँड वॉर' या सिनेमाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून या सिनेमाची चर्चा सुरू असून, रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल या तगड्या त्रिकुटामुळे सिनेमाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. आता निर्मात्यांनी सिनेमाचे फर्स्ट लूक पोस्टर रिलीज केले असून, त्यामध्ये रणबीर कपूरची झलक पाहायला मिळत आहे. रणबीर कपूर एका गाडीमध्ये ड्रायव्हिंग करताना दिसत आहे. त्याचा एक हात गाडीच्या दरवाजावर असून, हाताला जखम झाल्याचे पोस्टरमध्ये दिसते. रणबीरचा हा लूक समोर येताच सोशल मीडियावर चाहत्यांच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. 'प्रेमात घायाळ झालेला रणबीर' अशा स्वरूपाच्या कमेंट्सही नेटकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. रणबीर कपूरने यापूर्वी दमदार भूमिका साकारून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. त्यामुळे 'लव्ह अँड वॉर'मध्ये त्याची नेमकी भूमिका काय असणार, याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. या सिनेमात आलिया भट्ट आणि विकी कौशल यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. दरम्यान, फर्स्ट लूकसोबत निर्मात्यांनी सिनेमाच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीखही जाहीर केली आहे. 'तो दर्जा, ती आभा, ती उत्कटता!' असे कॅप्शन देत 'लव्ह अँड वॉर' २१ जानेवारी रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असल्याचे म्हटले आहे. भव्यदिव्य मांडणी आणि संजय लीला भन्साळी यांच्या दिग्दर्शनामुळे या सिनेमाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. आता सिनेमाच्या ट्रेलर आणि गाण्यांची प्रेक्षकांना उत्सुकता लागली आहे. 'लव्ह अँड वॉर' सिनेमाची कथा प्रामुख्याने युद्ध आणि देशावरील निष्ठा यांच्या पार्श्वभूमीवर उलगडणारा एक त्रिकोणी प्रेमसंबंधावर आधारित असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या चित्रपटाच्या माध्यमातून रणबीर, आलिया आणि विकी हे तिघेही पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. त्यामुळे या तगड्या स्टारकास्टच्या अभिनयाची रंगत पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. संजय लीला भन्साळी यांच्या खास शैलीतील भव्य दृश्यरचना आणि भावनिक कथानकाची झलक सिनेमात पाहायला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'लव्ह अँड वॉर'च्या प्रदर्शनाकडे बॉलिवूडप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# भारतीय कबड्डी संघ दोन्ही गट उपांत्य फेरीत

## पुरुष गटात चायनीज तैपेईचा, तर महिला गटात जपानचा धुव्वा; भारताची अपराजित कामगिरी

महाईन्यूज । मुंबई

**आशियाई क्रीडा स्पर्धेत गतविजेत्या भारताने अपराजित घोडदौड कायम राखत कबड्डीच्या पुरुष व महिला या दोन्ही गटांत उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. साखळी फेरीत दोन्ही संघांनी प्रभावी कामगिरी नोंदवत प्रतिस्पर्ध्यांवर एकतर्फी विजय मिळवले. गुरुवारी पार पडलेल्या 'अ' गटातील अखेरच्या सामन्यांमध्ये भारताने चायनीज तैपेई आणि जपानचा धुव्वा उडवला. भारतीय पुरुष संघाने चायनीज तैपेईचा ३७-२१ असा पराभव केला, तर भारतीय महिला संघाने यजमान जपानवर ५०-२५ अशी मात करत गटात अव्वल स्थान पटकावले.**



दुसरीकडे, महिला संघानेही साखळी फेरीत अपराजित राहण्याची परंपरा कायम ठेवली. सुरुवातीच्या सामन्यात बांगला देशचा पराभव केल्यानंतर भारताने दुसऱ्या सामन्यात इराणवर ३७-२३ अशी मात केली होती. जपानविरुद्धचा सामना भारतासाठी एकतर्फी ठरला. पहिल्या सत्रात ३२-१३ अशी आघाडी घेतल्यानंतर भारतीय महिलांनी दुसऱ्या सत्रात आणखी १८ गुणांची भर घातली. महिला संघाने ३७ आऊट गुण, सात बोनस गुण आणि लोणचे सहा गुण नोंदवले.

कबड्डीचा आशियाई क्रीडा स्पर्धेत १९९० मध्ये समावेश झाल्यापासून भारतीय पुरुष संघाने या स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली आहे. भारताने आतापर्यंत आठ सुवर्णपदकांसह एकूण नऊ पदके मिळवली आहेत. केवळ २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले होते. त्यामुळे यंदाच्या स्पर्धेत पुन्हा सुवर्णपदक मिळवण्याच्या भारताच्या प्रयत्नांकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

महिला संघाने साखळी फेरीत बांगलादेशला पराभूत करून मोहिमेला सुरुवात केली होती. त्यानंतर इराणवर ३७-२३ असा विजय मिळवत संघाने आपली ताकद दाखवली. जपानविरुद्धच्या विजयाने भारताने गटातील तिन्ही सामने जिंकत अपराजित कामगिरी नोंदवली. आता भारतीय पुरुष आणि महिला संघ उपांत्य फेरीत आपली विजयी मालिका कायम ठेवून अंतिम फेरीकडे वाटचाल करण्याच्या तयारीत आहेत.

### एकावेळी २२ सामने खेळले जायचे

पुरुष संघाने साखळी फेरीतील सलग चौथा विजय नोंदवत उपांत्य फेरीसह किमान कांस्यपदक निश्चित केले आहे. याआधी भारताने दक्षिण कोरिया, जपान आणि बांगला देशचा पराभव केला होता. चायनीज तैपेईविरुद्ध भारताने सुरुवातीपासूनच नियंत्रण राखत मध्यंतरापर्यंत २३-११ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रातही १४-१० अशी आघाडी राखत भारताने विजयावर शिक्कामोर्तब केले. १९९० मध्ये कबड्डीचा आशियाई क्रीडा स्पर्धेत समावेश झाल्यापासून भारतीय पुरुष संघाने आठ सुवर्णांसह एकूण नऊ पदके जिंकून या खेळावर निर्विवाद वर्चस्व राखले आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत सीमा कुमारीला महिलांच्या १०,००० मीटर शर्यतीत कांस्य पदक

महाईन्यूज । मुंबई

**आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आज (दि.२४) एकूण पाच पदके जिंकली. यामध्ये दोन रौप्य आणि तीन कांस्य पदकांचा समावेश आहे. भारताची पदकसंख्या १७ झाली आहे; यात नऊ कांस्य, सात रौप्य आणि एका सुवर्ण पदकाचा समावेश आहे. महिला क्रिकेट संघाने भारतासाठी आतापर्यंतचे एकमेव सुवर्ण पदक जिंकले आहे. पदक तालिकेत भारत सध्या १५ व्या स्थानावर आहे.**




### १६ वर्षांचा दुष्काळ संपला

सीमा कुमारीने महिलांच्या १०,००० मीटर शर्यतीत कांस्य पदक जिंकले. अत्यंत चुरशीच्या अंतिम शर्यतीत तिने ३२ मिनिटे ५०.०५ सेकंदांची वेळ नोंदवत पदक निश्चित केले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिलांच्या या प्रकारात भारताने १६ वर्षांनंतर पदक जिंकले आहे; स्पर्धेच्या इतिहासात या विशिष्ट प्रकारात भारताने पदक जिंकण्याची ही केवळ तिसरी वेळ आहे. आपली उत्कृष्ट कामगिरी कायम राखत, भारताच्या पुरुष आणि महिला कबड्डी संघांनी आपापल्या गटात अव्वल स्थान पटकावत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. भारतीय पुरुष संघाने गटातील शेवटच्या सामन्यात चायनीज तैपेईचा ३७-२१ असा पराभव केला.

भारताने ४x४०० मीटर मिश्र रिलेमध्ये रौप्य पदक जिंकले. पूवम्मा राजू, विशाल थेन्नारासू, विथ्या रामराज आणि मनू टी.एस. या चौघांच्या संघाने ३ मिनिटे १४.४६ सेकंदांची वेळ नोंदवत हे पदक पटकावले. अंतिम टप्प्यातील उत्कृष्ट कामगिरीमुळे विथ्या रामराजने भारतासाठी हे पदक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. बहरीनने ३ मिनिटे १२.८७ सेकंदांची वेळ नोंदवत 'गेम्स-विक्रम' (स्पर्धेतील विक्रम) प्रस्थापित केला आणि सुवर्ण पदक जिंकले. २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारताने या प्रकारात रौप्य पदक जिंकले होते.

अनंतजीत सिंग नरुका आणि परिनाज धलिवाल यांनी मिश्र सांघिक स्कीट प्रकारात कांस्य पदक जिंकले. भारताला नेमबाजीतून मोठ्या अपेक्षा होत्या, परंतु खेळाडूंची कामगिरी आतापर्यंत अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. बुधवारी महिलांच्या एअर पिस्तूल संघाला पदक जिंकण्यात अपयश आले. आज पुरुष संघाची कामगिरीही निराशाजनक राहिली.

रोइंगमध्ये, सतनाम सिंग आणि सलमान खान या जोडीने पुरुषांच्या 'डबल स्कल्स' प्रकारात कांस्यपदक जिंकून इतिहास रचला. या प्रकारातील हे भारताचे पहिलेच पदक आहे. ही भारतीय जोडी १,५०० मीटरच्या टप्प्यापर्यंत दुसऱ्या स्थानावर होती, परंतु शेवटच्या ५०० मीटरमध्ये ती तिसऱ्या स्थानावर घसरली. नागारागावा इंटरनॅशनल रेगाटा कोर्सवर झालेल्या या स्पर्धेत, भारतीय जोडी चीनपेक्षा ३.८८ सेकंद मागे राहिली; चीनने ६:१३.२५ वेळेसह सुवर्णपदक जिंकले. वुशू खेळाडू रोशिबिना देवीने रौप्यपदक जिंकले. सलग दुसऱ्यांदा रौप्यपदक आणि एकूण तिसरे पदक जिंकून, रोशिबिना आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील भारताची सर्वात यशस्वी वुशू खेळाडू ठरली आहे. महिलांच्या ६० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत तिला चीनच्या झांग झियाओयूकडून पराभव पत्करावा लागला.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
SHAPE YOUR FUTURE.
LEAD WITH JUSTICE.
B.A. LL.B. (Hons.)
&
B.B.A. LL.B. (Hons.)
INTEGRATED 5 YEAR PROGRAMS
Build a Strong Foundation in Law.
Make an Impact.
Create Change.
ADMISSION OPEN
2026

# पिंपरीतील भाजप नगरसेवकांना ‘शिस्तीचे धडे’

## गटतट आणि समन्वयाच्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर फडणवीस घेणार दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्ताधारी भाजपमध्ये असलेल्या गटतटामुळे वेगवेगळे प्रकरणे समोर येत आहेत. त्यामुळे नाहक भाजपची बदनामी होत आहे. सत्ता टिकवण्याबरोबरच पक्षांतर्गत शिस्त आणि समन्वय राखण्याचे आव्हान उभे राहिले आहे.**




या पार्श्वभूमीवर नगरसेवकांना पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त आणि महापालिकेच्या कारभाराचे धडे देण्यासाठी भाजपकडून पाच आणि सहा ऑक्टोबरला निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वत: उपस्थित राहून नगरसेवकांना धडे देणार असून, पक्ष शिस्तीबाबत संवाद साधणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपने 84 जागांसह सत्ता दुसऱ्यांदा ताब्यात घेतली आहे. एवढे मोठे संख्याबळ मिळाल्यानंतर नगरसेवकांची वाढलेली राजकीय महत्त्वाकांक्षा, स्थानिक नेत्यांमधील मतभेद आणि गटतटांचे राजकारण यामुळे पक्षांतर्गत व्यवस्थापनाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा बनला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगरसेवकांचे प्रशिक्षण भाईंदर, मुंबई येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. पक्षाच्या पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानअंतर्गत राज्यतील विविध महापालिकांतील भाजप नगरसेवकांसाठी प्रशिक्षण शिबिरे सुरू आहेत.

या प्रशिक्षणास मुख्यमंत्री फडणवीस हे उपस्थित राहणार आहेत. ते नगरसेवकांना शिस्तीचे तसेच, महापालिका कामकाजाचे धडे देणार आहेत. महापालिकेतील पदे, समित्या आणि विविध विषयांवरून नगरसेवकांमध्ये स्पर्धा वाढली आहे. पक्षसंघटनेशी बांधिलकी, सामूहिक निर्णय आणि प्रशासनाची समन्वय यावर प्रशिक्षणात मार्गदर्शन केले जाणार आहे.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून नव्या नगरसेवकांना पक्षाच्या संघटनात्मक रचनेची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. महापालिकेतील कामकाज करताना पक्षाच्या धोरणांशी सुसंगत भूमिका घेण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. नगरसेवकांनी विकासकामांना प्राधान्य देताना प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधावा, यावरही भर दिला जाणार आहे. तसेच, नागरिकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यांची कामे मार्गी लावण्याच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन होणार आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून नगरसेवकांना स्थानिक पातळीवरील संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले जाण्याची शक्यता आहे. आगामी काळात महापालिकेतील सत्ताकारण आणि संघटनात्मक जबाबदाऱ्या यांचा समतोल राखण्याचे आव्हान नगरसेवकांसमोर असणार आहे.

### कमिटीकोअर कमिटीने टोचले कान

भाजप पक्षाची शहराची कोअर कमिटी आहे. या कमिटीकडून पिंपरी-चिंचवड शहर आणि महापालिकेसंदर्भातील महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे, कोणते धोरण सुरू ठेवायचे, त्याबाबत कमिटीकडून महापालिका पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातात. त्याप्रमाणे पदाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते. मात्र, पदाधिकाऱ्यांमध्ये एकवाक्यता नसल्याने एका विषयांवर वेगवेगळी मत प्रदर्शन पदाधिकाऱ्यांकडून केले जात असल्याने पक्षशिस्तीचे वाभाडे निघत आहेत. त्यावरुन कोअर कमिटीने पदाधिकाऱ्यांना शिस्तीचे डोस दिले आहेत. या निवासी प्रशिक्षणानंतर नगरसेवकांच्या कामकाजात सुधारणा होण्याची शक्यता आहे.

# पिंपरीत ‘मेड इन पाकिस्तान’ ब्युटी क्रिमची विक्री, ‘एटीबी’ची कारवाई

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील रिव्हर रोड परिसरात ‘मेड इन पाकिस्तान’ असा उल्लेख असलेल्या ब्युटी क्रीमची विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेने (एटीबी) संबंधित कॉस्मेटिक्स दुकानावर छापा टाकून कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरातील सौंदर्यप्रसाधनांच्या विक्रीबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी येथील रिव्हर रोडवरील एका कॉस्मेटिक्स दुकानात ‘मेड इन पाकिस्तान’ असा उल्लेख असलेली ब्युटी क्रीम विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. सदर उत्पादन बनावट असून, भारतात त्याच्या विक्रीवर बंदी असल्याचे पोलिसांच्या कारवाईतून समोर आले आहे. संबंधित दुकानात हे उत्पादन ग्राहकांना विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवण्यात आले होते. त्यानंतर एटीबीच्या पथकाने दुकानावर छापा टाकून संशयित मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पिंपरी बाजारपेठेतील एका व्यावसायिकाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. संबंधित व्यक्तीने मूळ कंपनीचे मलम असल्याचे भासवून बनावट क्रीम विक्रीसाठी ठेवल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या उत्पादनावर ‘मेड इन पाकिस्तान’ असा उल्लेख असल्याचेही पोलिसांच्या तपासात आढळले. भारतात विक्रीस बंदी असलेल्या उत्पादनाचा साठा आणि विक्री करण्याचा प्रयत्न केल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही कारवाई केली.

एटीबीच्या कारवाईनंतर जप्त करण्यात आलेल्या क्रीमची तपासणी तसेच या उत्पादनाचा पुरवठा कुठून झाला, याबाबतचा तपास सुरू आहे. संबंधित व्यावसायिकाकडे हे उत्पादन कोणाकडून आले आणि त्याची विक्री किती काळापासून सुरू होती, याचीही माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पिंपरी पोलीस करीत आहेत.

सौंदर्यप्रसाधने खरेदी करताना ग्राहकांनी उत्पादनाची कंपनी, लेबल, उत्पादनाची माहिती आणि विक्रीसंदर्भातील वैधता तपासणे आवश्यक आहे. बनावट किंवा अनधिकृत उत्पादनांच्या वापरामुळे ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा उत्पादनांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर संबंधित यंत्रणांकडून कारवाई होणे महत्त्वाचे ठरते.

### रिव्हर रोडवरील कॉस्मेटिक्स दुकानावर छापा

या प्रकरणानंतर पोलिसांकडून संबंधित दुकानात विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या इतर सौंदर्यप्रसाधनांचीही तपासणी करण्यात येत आहे. जप्त करण्यात आलेल्या क्रीमचा पुरवठा नेमका कुठून झाला, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. संबंधित उत्पादन दुकानापर्यंत कोणत्या माध्यमातून पोहोचले आणि त्यामागे आणखी कोणी व्यक्ती किंवा विक्रेते सहभागी आहेत का, याची माहिती घेतली जात आहे. तसेच या क्रीमची यापूर्वी किती प्रमाणात विक्री झाली, याचाही तपास केला जात आहे.

# डॉ.डी. वाय. पाटीलमध्ये 'दीक्षारंभ' सोहळा उत्साहात

## प्रथम वर्ष MCA व MBA विद्यार्थ्यांचा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स अँड मॅनेजमेंट* (DYPIMCAM), आकुर्डी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील प्रथम वर्ष एम.सी.ए. (MCA) व एम.बी.ए. (MBA) विद्यार्थ्यांसाठी वार्षिक 'दीक्षारंभ' (Induction Programme) सोहळा मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी शांताई सभागृहात यशस्वीरीत्या पार पडला. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून 'डेक्सिट ग्लोबल'चे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ डॉ. अभय जेरे आणि सन्माननीय अतिथी म्हणून 'टेक महिंद्रा'चे डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन विभागाचे व्हॉईस प्रेसिडेंट व ग्लोबल हेड श्री. गोपाळ परास निस उपस्थित होते.**




सकाळी विद्यार्थ्यांची नोंदणी आणि अल्पोपहाराने कार्यक्रमाची सुरुवात झाली, ज्यानंतर दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. के. निर्मला यांनी नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविक भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी तीन महत्त्वाचे स्तंभ मांडले: आयुष्यभर शिकत राहण्याची वृत्ती (Lifelong Learning), वेगाने होणाऱ्या तांत्रिक बदलांशी जुळवून घेण्यासाठी निरंतर कौशल्य आत्मसात करणे (Skill Adoption), आणि व्यावसायिक जीवनात प्रभावी संवाद कौशल्याचे (Communication Skills) महत्त्व. त्यांच्या भाषणानंतर, संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पदके देऊन सन्मानित करण्यात आले. 'डेक्सिट ग्लोबल'चे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ (तसेच केंद्र सरकारचे माजी मुख्य नवोपक्रम अधिकारी व AICTE चे माजी उपाध्यक्ष) यांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठांतराच्या मानसिकतेतून बाहेर पडून सर्जनशील आणि समस्या निवारण (Problem-solving) वृत्ती स्वीकारण्याचे आवाहन केले. त्यांनी 'डिझाइन थिंकिंग' (Design Thinking) पद्धती स्पष्ट करताना प्रत्यक्ष समस्या ओळखणे आणि त्यावर नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यावर भर दिला. यासोबतच त्यांनी रुपयाचे मूल्य, आर्थिक नियोजन, आयुष्यभर शिकण्याची वृत्ती आणि आधुनिक बाजारातील बदलांशी जुळवून घेण्याची उदाहरणे स्पष्ट केली.

'टेक महिंद्रा'चे डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन विभागाचे व्हॉईस प्रेसिडेंट व ग्लोबल हेड. त्यांनी यशस्वी करिअरसाठी ३ महत्त्वाचे सकारात्मक दृष्टिकोन मांडले— सतत होणाऱ्या बदलांचा स्वीकार करणे, नवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता ठेवणे आणि संघभावनेने समस्या सोडवणे. डीन कॅम्पस प्लेसमेंट (DDYPEC, आकुर्डी) यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी आणि कॉर्पोरेट जगतातील प्लेसमेंटच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप MCA विभागाच्या प्रमुख व उपप्राचार्य डॉ. कविता सूर्यवंशी यांच्या आभार प्रदर्शनाने झाला, ज्यानंतर राष्ट्रगीत आणि समूह छायाचित्राने सोहळ्याची सांगता झाली. या सोहळ्याचे आयोजन प्रा. राहुल चौधरी व प्रा. गिरिजा परांजपे यांनी केले.

### आर. ॲडमिरल अमित विक्रम यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

कॅम्पस डायरेक्टर यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, वैयक्तिक जबाबदारी आणि शैक्षणिक कठोर परिश्रम आत्मसात करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करत व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा.

## एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये 'धनसेतू' वाणिज्य सप्ताह उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**येथील एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या (एमआयटी एसीएससी) कला व वाणिज्य विभागातर्फे आयोजित 'धनसेतू – वाणिज्य सप्ताह २०२६–२७' हा आंतरमहाविद्यालयीन उपक्रम २१ व २२ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडला. 'कनेक्टिंग आयडियाज, क्रिएटिंग वेल्थ' या संकल्पनेवर आधारित या दोन दिवसीय उपक्रमात पुणे व परिसरातील २२ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.**




महाविद्यालयाच्या 'फ्युजन फेस्ट'चा भाग म्हणून आयोजित या उपक्रमाची रचना तरुण उद्योजकांसाठीच्या 'शार्क टँक' संकल्पनेवर करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांमधील विश्लेषणक्षमता, आर्थिक साक्षरता, सर्जनशीलता व उद्योजकीय वृत्तीला व्यासपीठ मिळवून देणे, हा त्यामागील उद्देश होता. यात शार्क टँक, शेअर मार्केट, बिझनेस क्विझ, विद्यार्थी संसद (वादविवाद), मेंटल मॅथ्स, स्पेल बी, बुद्धिबळ, क्यूब सॉल्व्हिंग, यूनो, ट्रेझर हंट, फॅशन शो, 'एमआयटी गॉट टॅलेंट', बीजीएमआय व फ्री फायर या ई-स्पोर्ट्स स्पर्धा तसेच स्टॉल्स असे एकूण १६ स्पर्धा व उपक्रम घेण्यात आले. विजेत्यांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे : 'एमआयटी गॉट टॅलेंट'मध्ये स्वाती शिंगाडे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रावणी गावडे व आरती ठाकूर अनुक्रमे उपविजेत्या ठरल्या. बुद्धिबळात सिर्धी राज एम. विजेता, तर अक्षांश शाह (एमआयटी एओई) व अक्षत कवळे उपविजेते ठरले. यूनोमध्ये स्वप्नील केळगंद्रा विजेता व संस्कार शिंदे उपविजेता ठरला.

क्यूब सॉल्व्हिंगमध्ये अनिश मुराडे विजेता, तर सार्थक अंभोरे व समुथ वाडेकर उपविजेते ठरले. बजीएमआयमध्ये 'एएम बॉईज ईस्पोर्ट्स' (डी. वाय. पाटील व जेएसपीएम महाविद्यालय) संघ विजेता, तर 'नरक ईस्पोर्ट्स' (एमआयटी डब्ल्यूपीयू व जेएसपीएम) संघ उपविजेता ठरला. ट्रेझर हंटमध्ये कन्हैया पाटील, सोहम पावसकर, सौरव बिरादार, जान्हवी शिवडेकर व दर्शिका पाटील यांच्या संघाने बाजी मारली. बिझनेस क्विझमध्ये आयुष कुमार ठाकूर विजेता ठरला. शेअर मार्केट स्पर्धेत सेंट व्हिन्सेंट महाविद्यालयाच्या ओमकार पवार याने प्रथम, तर योगेश बनसोडे याने द्वितीय क्रमांक मिळविला. फॅशन शोमध्ये सिद्धी रेड्डी व लक्ष अनंदानी यांनी अनुक्रमे महिला व पुरुष गटात विजेतेपद पटकावले.

या वेळी संस्थेचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालक डॉ. मानसी अतितकर, डॉ. अक्षदा कुलकर्णी, विविध स्कूलचे अधिष्ठाता व विभागप्रमुख उपस्थित होते. कला व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. अभिजीत नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक समन्वयक प्रा. प्रवीण खरात व डॉ. दीक्षा कदम यांनी उपक्रमाचे संयोजन केले. विद्यार्थी प्रमुख समन्वयक स्वप्नलिसा साहू, अथर्व चव्हाण व अनुष्का मोरे यांच्यासह विविध समित्यांतील विद्यार्थ्यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

DTE Code
**6310**

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**

Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507